सत्यमेव जयते

# राज्यपालांचे सचिवालय
# महाराष्ट्र राज्य
## राजभवन, मलबार हिल, मुंबई ४०००३५.

( ५ सप्टेंबर, २०२३ अखेर )

# नागरिकांची सनद

Website :- http://rajbhavan-maharashtra.gov.in

Email :- governor-mh@nic.in

ईपीएबीएक्स दूरध्वनी क्र. ०२२-२३६३ २३ ४३ / २३६९ ४७ ९९
२३६३ २४ २६ / २३६३ ४३ ८८

फॅक्स क्र. ०२२-२३६३ ३२ ७२

# मा.राज्यपाल यांचे सचिवालय

## कार्यालयाची संरचना

मा. राज्यपाल

मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव

मा. राज्यपालांचे सचिव यांचे कार्यालय

**मा.राज्यपाल यांचे सह/उप सचिव (वै.वि.मं./आदिवासी कक्ष)**

- 1-मानव वंशशास्त्रज्ञ
- 1-विधी अधिकारी
- 1-उपसंचालक
- 1-अधीक्षक
- 1-सहायक लेखा अधिकारी
- 1-लघुलेखक (उ.श्रे.)
- 2-सहायक
- 1-लिपिक टंकलेखक

<u>प्रशासन शाखा</u>

- 1-राज्यपालांचे अवर सचिव
- 2-राज्यपालांचे खाजगी सचिव (1 व 2)
- 1-जनसंपर्क अधिकारी
- 1-अधीक्षक
- 1-लेखा अधिकारी
- 2-लघुलेखक (उ.श्रे.)
- 5-सहायक
- 5-लिपिक टंकलेखक
- 5-दूरध्वनीचालक
- 3-वाहनचालक
- 33-जमादार, चोपदार, नाईक, दफतरी, रोनियो चालक, शिपाई आणि संदेशवाहक इ.

**मा.राज्यपाल यांचे सह/उप सचिव (शिक्षण)**

<u>शिक्षण शाखा</u>

- 1-अवर सचिव
- 1-अधीक्षक
- 3-सहायक
- 1- निवडश्रेणी लघुलेखक
- 1-लघटंकलेखक

मंजूर आकृतीबंधः- एकूण ८० अधिकारी / कर्मचारी

कार्यालयीन कामाची वेळः- सकाळी ०९.४५ ते सायंकाळी ०६. १५

# नागरिकांची सनद

**प्रस्तावनाः**

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १५३ व १५४ मधील तरतुदींनुसार, राज्यपाल हे राज्याचे कार्यकारी प्रमुख असतात. राज्याच्या कार्यकारी अधिकाराचा वापर संविधानानुसार राज्यपालांकडून किंवा त्यांच्या हाताखालील अधिकाऱ्यांमार्फत करण्यात येतो. राज्यपाल मंत्री परिषदेच्या मदतीने व सल्ल्याने, संविधानातील तरतुदीनुसार त्यांस प्राप्त अधिकारांचा वापर करतात. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१(२) नुसार विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विभागासाठी विकास मंडळे स्थापन करुन राज्याच्या गरजा विचारात घेऊन या तीन विभागांमध्ये विकासात्मक खर्चाचे समसमान वाटप करण्याची विशेष जबाबदारी राज्यघटनेने राज्यपालांवर सोपविलेली आहे. विद्यापीठ अधिनिमान्वये, राज्यपाल हे महाराष्ट्रातील विद्यापीठांचे कुलपती आहेत. सध्या महाराष्ट्र राज्यात २२ विद्यापीठे असून त्यात ११ परांपरागत विद्यापीठे व ४ कृषि विद्यापीठ, १ तंत्रज्ञान विद्यापीठ, १ संस्कृत विद्यापीठ, १ मुक्त विदयापीठ, १ आरोग्य विज्ञान विद्यापीठ, १ पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ व २ समूह विदयापीठांचा समावेश आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४४ मधील पाचव्या अनुसूचीनुसार राज्याच्या आदिवासी क्षेत्र विकासासंदर्भात विशेष स्वरुपाची संविधानीक जबाबदारी राज्यपालांवर सोपविलेली आहे. त्या जबाबदारीच्या अनुषंगाने राज्यपालांना सहाय्य करण्यासाठी राज्यपाल कार्यालयात आदिवासी विकास कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

२. **राज्यपाल सचिव कार्यालयाची रचनाः**

मा.राज्यपाल महोदयांना सचिवालयीन सहाय करण्याकरिता मा.राज्यपाल महोदयांचे सचिव यांच्या अधिपत्याखाली प्रशासन शाखा, शिक्षण शाखा, वैधानिक विकास मंडळ शाखा तसेच आदिवासी विकास कक्ष कार्यरत आहेत. या सर्व शाखांमार्फत त्यांच्याशी संबंधित नस्त्या मा.राज्यपाल महोदयांचे सचिव यांचेमार्फत राज्यपालांना सादर केल्या जातात. या शाखांकडे करण्यात आलेल्या कार्यालयीन कामाच्या विषयांची विभागणी परिशिष्ट-१ मध्ये दर्शविली आहे.

३. **गाऱ्हाणी व तक्रारी यांचे निराकरणः**

नागरिकांची काही गाऱ्हाणी असल्यास यासंबंधी त्यांना परिशिष्ट-१ मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांकडे तक्रार नोंदविता येईल. गाऱ्हाणी समक्ष भेटीत / पत्राने तथा ई-मेलद्वारे मांडता येतील.

४. नागरिकांच्या सनदेचा आढावा दरवर्षी घेण्यात येईल व त्यात आवश्यकतेनुसार बदल करण्यात येतील.

५. उद्दीष्टे :

जनतेला विहीत कालावधीत सेवा पूरविण्याच्या उद्देशाने नागरीकांची सनद हा उपक्रम राबविण्यात येत असून त्याअनुषंगाने कार्यवाही करीत असताना नागरिकांना सौजन्यपूर्ण वागणूक देण्याची जबाबदारी मा.राज्यपाल यांच्या सचिवालयाच्या अधिपत्याखालील प्रत्येक अधिकारी / कर्मचारी यांची राहील.

# <u>परिशिष्ट-१</u>

| अ.क्र. | विभागांतर्गत शाखा व त्यांच्याव्दारे करण्यात येत असलेली कार्यवाही | कार्यवाही करण्यास जबाबदार अधिकारी / कर्मचारी (दूरध्वनी क्रमांक) | विहित कालावधीत कार्यवाही करण्यात कसूर झाल्यास तक्रार करता येईल असे अधिकारी (दूरध्वनी क्रमांक) |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| अ) | **प्रशासन शाखाः** | श्री. विक्रम निकम,<br>अवर सचिव (प्रशासन)<br>दूरध्वनी क्र. ०२२-२३६७ ३६ ६६<br>विस्तार क्र. २८० | १) श्रीमती श्वेता सिंघल, भाप्रसे<br>मा.राज्यपाल यांच्या सह सचिव<br>दूरध्वनी क्र.०२२-२३६८ ३८२०<br><br>२) श्रीमती श्वेता सिंघल, भाप्रसे<br>मा.राज्यपाल यांच्या सचिव<br>(प्रभारी)<br>दूरध्वनी क्र.०२२- २३६३७६७१<br>/ २३६३०६३५<br>फॅक्स क्र. ०२२-२३६३३२७२ |
| १) | मुदतपूर्व सुटकेसंबंधीचे दयेचे अर्ज | | |
| २) | भारतीय संविधानातील तरतुदींनुसार राज्यपालांच्या मान्यतेसाठी येणा-या विविध विषयासंबंधीच्या नस्त्या. | | |
| ३) | विधीमंडळासंबंधीचे कामकाज | | |
| ४) | विधेयके व अध्यादेश | | |
| ५) | राज्यपाल अध्यक्ष असलेल्या महामंडळावरील नियुक्त्या | | |
| ६) | भारतीय संविधानातील तरतुदींनुसार करण्यात येणाऱ्या मंत्रीमंडळातील सदस्य, न्यायाधीश यांच्या नियुक्त्या | | |
| ७) | लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांच्या नियुक्त्या | | |
| ८) | लोक आयुक्त उप लोक आयुक्त व मुंबईचे नगरपाल यांच्या नियुक्त्या | | |
| ९) | महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाचे अध्यक्ष व सदस्यांच्या नियुक्त्या | | |
| १०) | राज्य मानवी हक्क आयोग, राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयुक्त, राज्य निवडणूक आयुक्त, वित्त आयोग यांचे अध्यक्ष व सदस्य यांच्या नियुक्त्या | | |
| ११) | संविधानातील तरतुदींनुसार राज्यपालांमार्फत करण्यात येणा-या विधानपरिषद व विधानसभेवर नाम निर्देशन | | |
| १२) | संविधानातील अनुच्छेद १९१ नुसार प्राप्त होणारे आमदारांच्या अनर्हतेबाबतचे अर्ज | | |
| १३) | फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १९७ नुसार प्राप्त होणारे खटला भरण्यास परवानगी मिळण्यासंबंधीचे अर्ज | | |
| १४) | रिट अर्ज | | |
| १५) | जनतेकडून प्राप्त होणा-या तक्रारी | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १६) | राज्यपाल सचिव कार्यालयातील कर्मचा-यांच्या आस्थापनाविषयक बाबी | | |
| १७) | राजभवनातील बैठका तसेच कार्यक्रमांचे आयोजन | | |
| १८) | दूरध्वनी, संगणक इत्यादींचे देखभाल संबंधित कामकाज | | |
| २०) | लेखनसामग्री पुरवठा | | |
| | | | |
| ब) | <u>शिक्षण शाखाः</u> | श्री.विकास कुलकर्णी,<br>प्रभारी अवर सचिव (शिक्षण)<br>दूरध्वनी क्र. ०२२- २३६१ ७८ २२<br>विस्तार क्र. २४२ | १) श्रीमती श्वेता सिंघल, भाप्रसे<br>मा.राज्यपाल यांच्या सह सचिव<br>दूरध्वनी क्र.०२२-२३६८ ३८२०<br><br>२) श्रीमती श्वेता सिंघल, भाप्रसे<br>मा.राज्यपाल यांच्या सचिव<br>(प्रभारी)<br>दूरध्वनी क्र.०२२- २३६३७६७१<br>/ २३६३०६३५<br>फॅक्स क्र. ०२२-२३६३३२७२ |
| १) | राज्यातील विद्यापीठांच्या कुलगुरुंच्या नेमणुका | | |
| २) | प्र-कुलगुरु यांच्या नेमणूका | | |
| ३) | कुलगुरु यांची रजा, सेवाशर्ती व इतर प्रकरणे तसेच त्यांच्या नियुक्ती संदर्भातील तक्रार अर्ज / प्रकरणे | | |
| ४) | विद्यापीठांच्या विविध प्राधिकरणांवर निवडून आलेल्या तसेच नामनिर्देशनाद्वारे / (co-option) द्वारे नियुक्त झालेल्या सदस्यांच्या संबंधीचे अपील / तक्रार अर्ज | | |
| ५) | विद्यापीठांचे कायदे तसेच परिनियम व अध्यादेश यामधील तरतुदींचे अन्वयार्थासंबंधीची (interpretations) प्रकरणे | | |
| ६) | विद्यापीठातील शिक्षकांच्या नेमणूकीसंबंधीचे महाराष्ट्र सार्वजनिक ि विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०२ (६) अंतर्गत आलेले अर्ज | | |
| ७) | शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांचेकडून आलेले तक्रार अर्ज तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी संघटनेकडून प्राप्त झालेल्या तक्रारी. | | |
| ८) | कुलपतींकडे विद्यापीठ कायद्याअंतर्गत विविध कलमांन्वये येणा-या तक्रारी | | |
| ९) | विद्यापीठाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने स्थापन करण्यात येणा-या चौकशी समितीबाबत | | |
| १०) | जनतेकडून प्राप्त झालेल्या विद्यापीठाशी / शिक्षण विभागाशी निगडित सर्वसाधारण तक्रारी | | |
| | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| क) | <u>वैधानिक विकास मंडळे आणि आदिवासी विकास कक्ष</u><br><br>राज्यपालांचे निर्देशाबाबत जनतेकडून प्राप्त झालेली निवेदने<br><br>म.ना.से (शिस्त व अपील) नियम १९७९ अंतर्गत मा.राज्यपालांना पाठविलेले अपील व पुनर्विलोकन अर्ज. | श्री. विकास व. कुलकर्णी,<br>उप संचालक,<br>वैधानिक विकास मंडळ<br>दूरध्वनी क्र.०२२- २३६३२३४३<br>विस्तार क्र. २८० | १) श्रीमती श्वेता सिंघल, भाप्रसे<br>मा.राज्यपाल यांच्या सह सचिव<br>दूरध्वनी क्र.०२२-२३६८ ३८२०<br>२) श्रीमती श्वेता सिंघल, भाप्रसे<br>मा.राज्यपाल यांच्या सचिव (प्रभारी)<br>दूरध्वनी क्र.०२२- २३६३७६७१ / २३६३०६३५<br>फॅक्स क्र. ०२२-२३६३३२७२ |
| | | | |
| ड) | <u>लेखा शाखा</u> | | |
| १) | कार्यालयाचे वेतन व भत्ता अदा करणे | | |
| २) | कर्मचाऱ्यांच्या शासकीय नियमानुसार देय आर्थिक मागण्या मंजूर करणे उदा. भिविष्य निर्वाह निधी, घर बांधणी अग्रिम, उत्सव अग्रिम, इत्यादी व त्याबाबतची देयके तयार करुन त्यांचे प्रदान संबंधितांना करणे | श्री.सुदिप साटम,<br>लेखा अधिकारी,<br>दूरध्वनी क्र. ०२२- २३६३ २३ ४३<br>विस्तार क्र. २१३ | श्री. विक्रम निकम,<br>अवर सचिव (प्रशासन)<br>दूरध्वनी क्र. ०२२- २३६७ ३६ ६६ |
| ३) | सेवा / साहित्य पुरवठादार / ठेकेदार यांच्या बिलांचे प्रदान करणे | | |